# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

## जिल्हा - अहमदनगर





डॉ. संजय चहांदे भा.प्र. से.
विभागीय आयुक्त, नाशिक विभाग.

प्राजक्ता लवंगारे भा.प्र. से.
मुख्य कार्यकारी अधिकारी

उमाकांत दांगट भा.प्र. से.
जिल्हाधिकारी अहमदनगर

# महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना

महाराष्ट्र राज्य देशातील एक पुरोगामी राज्य आहे. या पुरोगामी राज्याची पुरोगामी योजना म्हणजे रोजगार हमी योजना. सन १९७२ पासून राज्यात रोजगार हमी योजना राबविण्यात येत असून भारतीय संविधानाच्या अनुच्छेद ४१ मध्ये काम करण्याच्या हक्कासंबंधी असलेली निर्देशित तत्वे लक्षात घेऊन महाराष्ट्र रोजगार हमी कायदा १९७७ च्या रुपाने त्यास २६ जानेवारी १९७९ पासून संविधानिक स्वरुप देण्यात आले.

ग्रामीण भागाचे सुयोग्य विकासाचे धोरण आखून उपलब्ध मानवी संपत्तीद्वारा ग्रामीण भागात टिकाऊ सामुहिक मालमत्ता निर्माण करीत असतानाच ग्रामीण भागात राहणाऱ्या व अंग मेहनतीची अकूशल कामे करणाऱ्या मजूरांना रोजगार उपलब्ध व्हावा हे या योजनेचे प्रमुख उद्दिष्ट आहे. याच उद्देशाने केंद्रसरकारने ''राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा २००५'' पारीत केला असून सदर कायद्यान्वये ग्रामीण भागातील कुटूंबाला १०० दिवस रोजगार उपलब्ध करुन देण्याची हमी देण्यात आलेली आहे राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदयाची अंमलबजावणी करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने राज्याची रोजगार हमी योजना व केंद्राची राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना यांची सांगड घालून '' **महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजना**'' अंमलात आणण्याचा निर्णय घेतलेला आहे. राज्य शासन व केंद्र सरकारच्या रोजगार निर्मितीच्या सर्व योजना एकत्रित करुन त्यातील चांगल्या तरतुदीचा लाभ ग्रामीण भागातील मजूरांना देणारी ही एक अभिनव व व्यापक योजना आहे.

## योजनेची वैशिष्टे :-

- ग्रामपंचायत स्तरावर घ्यावयाच्या कामांची निवड ग्रामसभा करणार.
- तालुका पातळीवरील नियोजन आराखड्यास मंजूरी पंचायत समिती देणार.
- जिल्हा पातळीवरील नियोजन आराखड्यास मंजूरी जिल्हा परिषद देणार.
- मंजूर कामाच्या ५० टक्के खर्चाची कामे ग्रामपंचायत मार्फत राबविणार.
- कामाची मागणी करणाऱ्या कुंटूंबास ग्रामपंचायतीकडे नोंदणी करणे आवश्यक असून नोंदणी केल्यानंतर प्रत्येक कुटूंबास रोजगार पत्रक (जॉब कार्ड) मिळेल.
- १०० दिवसापेक्षा जास्त दिवस रोजगार देण्याची जबाबदारी राज्य शासनाच्या रोजगार हमी योजना निधीमधून पूर्ण करण्यात येईल.त्यामुळे कुटुंबास १०० दिवस रोजगार दिल्याचा हिशोब ठेवावा लागणार.
- केंद्र सरकाराने अधिसूचना पारित केल्यानंतर मजुरीचा किमान दर प्रतिदिन रुपये ६०/- या प्रमाणे राहील.

- अर्जदारास अकुशल काम मागणीचा अर्ज केल्यापासून १५ दिवसांचे आत रोजगार पुरविणे बंधनकारक आहे. जर रोजगार पुरविता आला नाही तर त्यास बेरोजगार भत्ता पहिल्या ३० दिवसापर्यंत किमान वेतनाच्या २५ टक्के आणि पुढील १०० दिवसापर्यंत किमान वेतनाचे ५० % दराने देय राहील.
- ग्रामीण क्षेत्रात राहणारी अंग मेहनतीचे काम करण्यास तयार असणारी प्रौढ व्यक्ती अर्जाद्वारे ग्रामपंचायत मध्ये, त्याचे कुटुंबातील सर्व व्यक्तींचे नाव व पत्ता नमुद केलेला अर्ज सादर करेल.
- कुटूंबाची एकदा केलेली नोंदणी पाच वर्षाचे कालावधी करिता राहील.
- या कायद्या अंतर्गत नवीन काम सुरु करतांना किमान ५० मजूर उपलब्ध व्हावयास पाहिजे.डोंगरी भागात तसेच वनीकरणाचे कामासाठी ही अट शिथील करण्यात आलेली आहे.
- राज्याचे रोजगार हमी कायद्या अंतर्गत मजूरांना मिळणाऱ्या सर्व सोयी सुविधा या योजने अंतर्गत मिळतील.

**ग्रामपंचायतीची जबाबदारी :-**

१) महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत कामाची निवड ही ग्रामसभेने करावयाची असून मंजूर करण्यात आलेल्या कामापैकी किमान ५० टक्के खर्चाची कामे ग्रामपंचायतीने करावयाची आहे.

२) रोजगाराची मागणी करणाऱ्या प्रत्येक कुटुंबासाठी रोजगार पत्रक (जॉबकार्ड) दयायचेअसून जॉबकार्डवर रोजगार मागणी करणाऱ्या सर्व प्रौढ व्यक्तींची नावे, वय व संपूर्ण पत्ता नोंदविलेला असेल तसेच त्यावर रोजगार मागणाऱ्या कुटुंबातील प्रौढव्यक्तीचेछायाचित्र चिकटविलेले असेल. रोजगार मागणाऱ्या कुटूंबाची एकत्रित यादी ग्रामपंचायतीस विहीत नमुन्यात तयार करावी लागेल. जॉबकार्ड असल्याशिवाय कुठल्याही कुटुंबातील प्रौढ व्यक्तीला रोजगार मिळणार नाही.

३) ग्रामसभेद्वारे ग्रामपंचायत क्षेत्रातील कामाची निवड करुन प्रस्ताव गट कार्यक्रम अधिकाऱ्यांकडे सादर करणे. प्रस्ताव सादर करतांना वेगवेगळ्या कामाची प्राथमिकता ठरविणे.

४) नोंदणीकृत अर्जदाराच्या मागणीनूसार रोजगार उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करणे.

५) ग्रामपंचायत मार्फत घेण्यात येणारी कामे आवश्यक तांत्रिक मापदंडानुसार व मोजमापानुसार असतील याची खात्री करणे.

६) ग्रामपंचायत क्षेत्रातील सुरु असलेल्या व पूर्ण झालेल्या कामाबाबत आवश्यक ती माहिती ग्रामसभेला देवून ग्रामसभेद्वारे सामाजिक लेखा परीक्षण करुन घेणे.

७) ग्रामपंचायत मार्फत योजेनची अंमलबजावणी करतांना काही वाद किंवा तक्रार असल्यास सदर बाब गट कार्यक्रम अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देणे.

८) योजनेअंतर्गत केलेल्या कामांचा अहवाल, लेखे, दस्तऐवज इत्यादीची मागणी नागरिकांनी केल्यास आवश्यक ती फी आकारुन नागरिकास देणे.

९) नागरिकांनी आवश्यक ती फी भरल्यास कामावरील हजेरी पत्रकाची तपासणी ग्रामपंचायत कार्यालयात करण्याकरिता नागरिकाला दस्त ऐवज उपलब्ध करुन देणे.

१०) रोजगार मागणाऱ्या अर्जदाराचा वैध अर्ज स्वीकारुन संबंधितास तारखेसह पोच देणे.

११) बेरोजगार भत्ता व मजूरी जाहीर केलेल्या तारखेला स्वतंत्र व्यक्ती समक्ष अदा करणे.

१२) रोजगार उपलब्ध करुन दिलेल्या व्यक्तीची यादी ग्रामपंचायतीच्या नोटीस बोर्डवर लावणे.

१३) ग्रामपंचायतीकडे नोंदणी केलेल्या कुटुंबाची माहिती तहसिलदार यांचेकडे पाठविणे.

१४) रोजगारासाठी अर्ज केलेल्या व्यक्तीला रोजगाराबाबत लेखी कळविणे व तशी माहिती नोटीस बोर्डवर प्रसिध्द करणे.

१५) आवश्यक ती फी भरुन जनतेला वार्षिक अहवाल उपलब्ध करुन देणे.

## पंचायत समितीची जबाबदारी :-

- ग्रामपंचायत व तालुकास्तरीय नियोजन आराखड्यास मंजूरी देवून जिल्हा परिषदेकडे अंतिम मंजूरीकरिता सादर करणे.

## जिल्हा परिषदेची जबाबदारी :-

पंचायत समिती निहाय घ्यावयाच्या कामांचे नियोजन आराखड्यास मंजूरी देणे.

## योजनेची अंमलबजावणी करणारे अधिकारी

**गट कार्यक्रम अधिकारी:**-तालुकास्तरावर योजनेच्या अंमबलबजावणीसाठी गट कार्यक्रम अधिकारी यांची नियुक्ती करण्यात येईल. तोपर्यंत तहसीलदार हे गट कार्यक्रम अधिकारी म्हणून काम पाहतील.

१) ग्रामपंचायत / पंचायत समितीकडून प्रस्तावित कामांचा आराखडा एकत्रीत करुन तालुक्याचा नियोजन आराखडा तयार करणे.

२) ग्रामपंचायत व कार्यान्वयीन यंत्रणा राबवित असलेल्या कामांचे पर्यवेक्षण करणे.

३) रोजगाराची मागणी व कामामधून उपलब्ध होणाऱ्या रोजगाराच्या संधी याचा मेळ घालणे. इतरत्र उपलब्ध असलेल्या रोजगाराबाबतची माहिती ग्रामपंचायतीला देणे.

४) मजूरांना रोजगार मिळत असल्याबद्दल खात्री करणे.

५) बेरोजगार भत्ता मंजूर करुन तो संबधितास दिल्याची खात्री करणे.

६) ग्रामपंचायतचे क्षेत्रातील सर्व कामांचे सामाजिक लेखा परिक्षण ग्रामसभेद्वारे करुन उद्‌भवलेल्या आक्षेपावर तात्काळ कार्यवाही करणे.

**सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी :-** जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी हे सह जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील. गट कार्यक्रम अधिकारी आणि विविध कार्यकारी यंत्रणा यांचेकडून प्राप्त नियोजन आराखडा एकत्रीत करुन त्यास जिल्हा परिषदेची मान्यता घेणे.

**जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी :-** जिल्हाधिकारी हे जिल्हयाकरिता जिल्हा कार्यक्रम समन्वय अधिकारी राहतील.

अ) कामांना प्रशासकीय मंजुरी देणे.

ब) गट कार्यक्रम अधिकारी आणि कार्यान्वयीन यंत्रणांशी समन्वय ठेवून या योजनेची अंमलबजावणी करणे.

क) गट कार्यक्रम अधिकारी यांचे कामकाजाचा आढावा घेणे. पर्यवेक्षण करणे, नियंत्रण ठेवणे.

ड) योजनांतर्गत चालू असलेल्या कामांच्या तपासण्या करणे.

इ) प्रत्येक वर्षाचे डिसेंबर महिन्यात पुढील वर्षासाठीचे रोजगाराची मागणी विचारात घेऊन नियोजन तयार करणे.

## योजनेअंतर्गत घ्यावयाच्या कामाचे प्राधान्य क्रम :-

- जलसंधारण व जलसंवर्धन कामे:- मातीचेबांध, दगडी बांध, ढाळीचे बांध, कंपार्टमेंट बांध, वनराई बंधारा, जैविक बांध, सलग समतल चर, तुटक समतल चर, ट्रेंच कम माऊंड, सामुहिक शेततळे, मातीचे धरण, साठवण तलाव, पाझर तलाव, पाझर कालवे, गाव तलाव, भूमीगत बंधारे, वन तलाव, बोडी नुतनीकरण.
- दुष्काळ प्रतिबंधक कामे (वनीकरणासहित) :- पडिक जमीनीवर वृक्ष लागवड, रस्त्याच्या बाजूला वृक्ष लागवड, रोप वाटीका, वृक्ष लागवड, जाळ रेषांची कामे, बांबु रांझ्या भोवती वर्तुळाकार चर काढणे, वृक्ष लागवड.

- जलसिंचन कालव्याची कामे(लघु व सुक्ष्म जलसिंचनाची कामे):- मातीचे कालवे, कालव्याचे नुतनीकरण.
- अनुसूचित जाती/जमाती, नवीन भुधारक किंवा इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांच्या जमिनीसाठी जलसिंचन निर्माण करण्याची कामे.
- पारंपरिक पाणीसाठ्याचे योजनेचे नुतनीकरण करणे व तलावातील गाळ काढणे.
- भूविकासाची कामे.
- पूरनियंत्रण व पूर संरक्षक कामे.
- ग्रामीण भागात बारमाही जोडरस्त्यांची कामे: इतर जिल्हा रस्ते, गांव रस्ते, गावातील अंतर्गत रस्ते, शेत रस्ते, स्मशानभूमी व पाणी पुरवठा इत्यादींना जोडणारे रस्ते, रस्त्यांचे नुतनीकरण, रस्त्यांचे रुंदीकरण.

## योजनेची अंमलबजावणी

- योजनेचा शुभारंभ - दि. २ फेब्रुवारी २००६.
- कुटुंब नोंदणी (मजुर नोंदणी) विशेष मोहीम दि. २ फेब्रुवारी ते १५ फेब्रुवारी २००६ दरम्यान ग्रामपंचायत स्तरावर राबविली जाणार.
- दि. २६ जानेवारी २००६ चे ग्रामसभेत योजनेची माहिती दिली जाणार.
- दि. २ फेब्रुवारी २००६ रोजी विशेष ग्रामसभा आयोजित करुन मजुर नोंदणीस प्रारंभ.
- दि. २० फेब्रुवारी २००६ पासून रोजगार पत्रकाचे वाटप.



**संपर्क** - ग्रामपंचायात कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, तहसिल कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, जिल्हा परिषद कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय.